आर.सी.सी क्र.१५२५/२०१८

सरकार विरुध्द दिलीप

**निशाणी क्र.४१/ क**

**अभियोग पक्षा तर्फे साक्षीदार क्रमांक–४ यांची जबानी–**

मी प्रतिज्ञापुर्वक शपथेवर निवेदन करतो की,

**माझे नाव — श्री. प्रभाकर जयवंत मोरे,**

वय — ५१ वर्षे, व्यवसाय — नौकरी, प्रबंधक, विवेकानंद महाविद्यालय, औरंगाबाद.

निवासस्थान – सातारा परिसर, बीड बायपास, औरगाबाद.

-----------------------------------------------

**सरतपासणी अभियोग पक्षा करीता**

**श्री. ए. झेड काझी, सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचे तर्फे –**

१. मी फिर्यादी श्री. तुषार काशिनाथ सिसोदे यांना ओळखतो. मी विवेकानंद महाविद्यालय, औरंगाबाद येथे सन–२०१० पासुन आज पावेतो प्रबंधक या पदावर कार्यरत आहे. मी आरोपी दिलीप यशवंता हाके यास ओळखतो. ते माझ्या हाताखाली सहाय्यक या पदावर कार्यरत होते. आरोपी यांची मार्च–१९९९ ला सहाय्यक पदावर नेमणुक झाली होती व आजही ते याच पदावर कार्यरत आहेत. त्यांनी नियुक्तीच्या वेळी ते अनुसूचित जमातीचे असल्याबाबत जातप्रमाणपत्र सादर केले होते. सदर जातप्रमाणपत्राच्या आधारवर अनुसूचित जमातीच्या प्रवर्गातून त्यांना नियुक्त करण्यात आले होते. सन–२००७ मध्ये आमच्या महाविद्यालयातील प्राचार्यांने आरोपीचे जात प्रमाणपत्र पडताळणीकरीसाठी विभागीय जात पडताळणी समिती, औरंगाबाद यांचेकडे पाठविले होते. मार्च, एप्रिल–२०१७ मध्ये सदर समितीने आरोपीचे जातप्रमाणपत्र अवैध ठरविण्यात आले असल्याचे पत्राद्वारे आमच्या महाविद्यालयातील प्राचार्यांना कळविले. सदर पत्र प्राचार्यांनी महाविद्यालयातील संचालक मंडळाकडे पाठविले. संचालक मंडळाने फिर्यादी श्री. तुषार काशिनाथ सिसोदे यांना आरोपी विरुध्द गुन्हा नोंदविण्यास प्राधिकृत केले व त्यानुसार त्यांनी आरोपी विरुध्द फिर्याद दिली. सदर घटनेबाबत पोलीसांनी माझा जबाब नोंदविला. आरोपीने खोटे जात प्रमाणपत्र सादर करून नौकरी मिळविली. तसेच त्याद्वारे शासनाची व महाविद्यालयाची फसवणूक केली. आरोपी आज कोर्टासमक्ष न्यायालयात हजर आहे.

**निशाणी क्र.४१/ क**

**<u>सरतपास संपला.</u>**

**<u>उलटतपास आरोपी करीता श्री. ठाकरे ए.एके. विधीज्ञ यांचे द्वारा–</u>**

५. हे म्हणने खरे आहे की, मी प्रबंधक या पदावर कार्यरत असण्यापुर्वीच आरोपीचा जात पडताळणीबाबतचा प्रस्ताव गेला होता. हे म्हणने खरे आहे की, त्यामुळे त्या प्रस्तावातील कागदपत्रे काय होते हे मला माहीत नाही. हे म्हणने खरे आहे की, माझ्या कार्यकाळात ते कागदपत्रे मी हाताळले नाहीत. हे म्हणने खरे नाही की, माझ्या सरतपासातील मजकुर खोटा आहे. हे म्हणने खरे नाही की, आरोपीच्या जातप्रमाणपत्राबाबत मला काहीही माहिती नाही. हे म्हणने खरे नाही की, आमच्या व्यवस्थापनाच्या सांगण्यावरून मी खोटी साक्ष देत आहे. **<u>उलटतपास –संपला.</u>**

**<u>फेरतपास – काही नाही</u>.**

| | |
|---|---|
| समक्ष | श्रवणोत्तर स्वीकृती. |
| **–/स्वाक्षरीत/–** | **–/स्वाक्षरीत/–** |
| ( श्रीमती ए.डी. बोस ) | ( श्रीमती ए.डी. बोस ) |
| मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद | मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद |

**दिनांक– २५/०९/२०२४**